महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती

जिल्हा स्त्री रुग्णालय परिसर, श्रीकृष्णपेठ, अमरावती, महाराष्ट्र - ४४४ ६०१

वेबसाईट : gmcamravati.org फोन नं.0721-2993171

जा.क्र.शावैमअ/वि.वे./थेट मुलाखत/व.नि./ता.नि./2135-37/२५ दिनांक :18/03/२०२५

# थेट मुलाखत

## Walk-in-Interview

विषय : वरिष्ठ निवासी (सेवा) संवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने १२० दिवसांकरीता भरणे करीता दररोज थेट मुलाखत आयोजित करण्याबाबत...

संदर्भ : शासन निर्णय क्र:- पदनि-२०२३/प्र.क्र.१८६/२३ वैसेवा-२ दिनांक : ०६ मार्च, २०२४.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती या संस्थेतील विविध विषयातील वरिष्ठ निवासी (सेवा) या संवर्गातील राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार आवश्यक तसेच मंजुर पदांवर संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडुन बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत संस्थास्तरावर स्थानिक निवड मंडळा मार्फत तात्पुरत्या स्वरुपात निव्वळ १२० दिवसांकरीता कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता दररोज थेट मुलाखत आयोजित करण्यात येत आहे. विभागनिहाय रिक्त पदांचा तक्ता, अर्जाचा नमुना, शैक्षणिक अर्हता, अटी व शर्थी व इतर माहितीदर्शक तक्ता संस्थेचे संकेतस्थळ **gmcamravati.org** वर उपलब्ध आहे.

**थेट मुलाखत दिनांक व वेळ : दररोज (शासकीय सुटी वगळुन, कार्यालयीन वेळेत)**
**स्थळ : मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांचे दालन.**

तरी राष्ट्रीय आयूर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे मानकानुसार/नियमानुसार वरिष्ठ निवासी (सेवा) पदाकरीता पात्र उमेदवारांनी आपला अर्ज परिपुर्ण भरुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या सुस्पष्ट साक्षांकीत छायाप्रतीसह उपरोक्त नमुद वार व वेळेत वरिष्ठ निवासी (सेवा) पदाकरीता थेट मुलाखतीस (Walk-In-Interview) उपस्थित राहावे.

(डॉ.किशोर इंगोले)
अधिष्ठाता
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती.**

प्रत,
१. संस्थेच्या संकेतस्थळ gmcamravati.org वर प्रसिध्द करणेकरीता.
२. नोटीस बोर्ड - महाविद्यालय/रुग्णालय/ग्रंथालय/विभाग........

**प्रत माहितीस सविनय सादर,**
१) मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई
२) मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

## वरिष्ठ निवासी (सेवा) संवर्गातील रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | विषय | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | शरिररचनाशास्त्र | ०३ | राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे नियमानुसार |
| २ | शरिरक्रियाशास्त्र | ०३ | |
| ३ | जिवरसायनशास्त्र | ०३ | |
| ४ | औषधशास्त्र | ०१ | |
| ५ | न्यायवैद्यशास्त्र | ०१ | |
| ६ | जनऔषधवैद्यशास्त्र | ०१ | |
| ७ | औषधवैद्यकशास्त्र | ०३ | |
| ८ | बालरोगचिकीत्साशास्त्र | ०१ | |
| ९ | क्षय व उररोगशास्त्र | ०१ | |
| १० | शल्यचिकीत्साशास्त्र | ०३ | |
| ११ | कान, नाक, घसा | ०१ | |
| १२ | नेत्रशल्य चिकीत्साशास्त्र | ०१ | |
| १३ | स्त्रिरोग व प्रसुतीशास्त्र | ०१ | |
| १४ | बधिरीकरणशास्त्र | ०१ | |
| १५ | क्ष -किरणशास्त्र | ०१ | |
| १६ | आपातकालीन औषवैद्यशास्त्र | ०६ | |
| | **एकुण** | **३१** | |

टिप** : वरिलप्रमाणे रिक्त पदांच्या संख्येत कमी अथवा जास्त असा बदल होऊ शकते.

**अ) शैक्षणिक व इतर अर्हता कागदपत्र : राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग यांचे नियमानुसार.**

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १ | मुळ अर्ज |
| २ | एम.बी.बी.एस.प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्र |
| ३ | पदवी प्रमाणपत्र |
| ४ | एम.डी/एम.एस/डीएनबी प्रमाणपत्र व प्रयत्न प्रमाणपत्र |
| ५ | अद्ययावत एम.एम.सी/एन.एम.सी.नोंदणी प्रमाणपत्र |
| ६ | बंधपत्रित असल्याचे प्रमाणपत्र (लागु असल्यास) |
| ७ | पासींग सर्टिफीकेट UG/PG |
| ८ | Internship/Residency Completion Certificate |
| | अनुभव प्रमाणपत्र |
| ९ | जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र/NCL (लागु असल्यास) |
| १० | एस.एस.सी.बोर्ड प्रमाणपत्र/वैध पासपोर्ट (वय पुरावा करता) |
| ११ | आधार कार्ड/पॅन कार्ड/मतदान कार्ड |

**ब) वयोमर्यादा : ४५ वर्ष**

**क) वेतनश्रेणी : विद्यावेतन / ठोक मानधन नियमानुसार**

(पुढील पानावर)

**इ) जाहिरातीमध्ये बदल /दुरुस्ती /रदद करण्याचा अधिकार.**

**या जाहिरातीमधील कोणत्याही मजकुरात उदा.अटी/शर्ती/नियम/पदसंख्या कमी अथवा जास्त करणे/जाहीरात रदद करणे/अंशत: बदल करणे इत्यादींचा अधिकारी अधिष्ठाता/स्थानिक निवड मंडळ यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे या बाबतचे अंतिम निर्णय व अधिकार अधिष्ठाता यांना असतील.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :**

१. वरील दर्शविलेल्या पदसंख्येत बदल अथवा कमी जास्त होऊ शकते.

२. वरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन त्यास राज्य शासनाचा कर्मचारी म्हणता येणार नाही.

३. उमेदवारांना मुलाखतीच्या ठिकाणी स्वत: स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

४. वरिष्ठ निवासी पदावर बंधपत्रित उमेदवारांची निवड करण्यात येईल. बंधपत्रित उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त राहीलेल्या पदावर अबंधपत्रित उमेदवारांचा विचार करण्यात येईल. संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडुन बंधपत्रित उमेदवार उपलब्ध झाल्यास/रुजु झाल्यास संबंधीत विषयामध्ये भरण्यात आलेल्या उमेदवारांची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

५. निवड झालेल्या उमेदवाराने २५०००/- एवढी रकमेचा धनादेश अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अमरावती यांचे नावे अनामत रक्कम म्हणुन रोख विभागाकडे सादर करावे लागेल व त्यासंबंधीच्या पावतीची नोंद आवासी निवासी विभागाकडे करावी.

६. अनामत रक्कम पदाचा पूर्ण कालावधी संपुष्ठात आल्यावर अथवा पद सोडण्याबाबतची एक महीना पूर्व सूचना दिल्यानंतर परत करण्यात येईल. पद सोडावयाचे असल्यास त्याबाबत एक महिना अगोदर पद सोडत असल्याची पुर्वसुचना न दिल्यास सदर अनामत रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल.

७. अंतिम निवड झालेल्या/रुजू झालेल्या उमेदवारास कोणत्याही खाजगी/मंडळ/निमशासकीय संस्थेत/कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारची नोकरी स्विकारता येणार नाही किंवा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. जर असे निदर्शनास आले तर सदर उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८. निवड झालेल्या उमेदवाराने विभागप्रमुखांच्या निर्देशानुसार २४ तास रुग्णसेवेकरीता उपस्थित असणे बंधनकारक आहे. उमेदवार रुग्णसेवेमध्ये हलगर्जीपणा करत असल्याचे संस्थाप्रमुख अथवा विभागप्रमुख यांचे निदर्शनास आल्यास सदर उमेदवाराची सेवा तात्काळ कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

९. प्रशासकीय किंवा काही कारणास्तव निवड (भरती प्रक्रिया) कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्यावर थांबविण्याचा किंवा रदद करण्याचा किंवा बदल करण्याचा संपुर्ण अधिकारी अधिष्ठाता/स्थानिक निवड मंडळास राहील.

५. इतर संस्थेतील कार्यरत उमेदवारांनी अर्जासोबत संबंधीत संस्था प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे.

६.सदर जाहिरातीमधील नमुद पदे ही तात्पुरत्या तसेच पुर्णत: कंत्राटी स्वरुपाची असुन भविष्यात सउदर पदावर नियमीत करण्याकरीता कोणताही दावा करता येणार नाही.

७. वरिष्ठ निवासी या पदाकरीता शासकीय निवासस्थान उपलब्ध नाही.

( डॉ.किशोर इंगोले )
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती.